# नोंदणी प्रपत्र

सहभागी व्यक्तीचे नाव:- वैशाली शंकरराव शेंडे

पद :- विषयसाधनव्यक्ती

कार्यालयीन पत्ता :- उन्नत समूह साधन केंद्र,समग्र शिक्षा मनपा,अकोला.

जिल्हा कार्यालय :- जि. शैक्ष. सा. व्या. वि. संस्था, अकोला

ई-मेल :- vaishalishendek@gmail.com

मोबाईल नंबर :- 9049445259

शैक्ष. व व्याव. अहर्ता :- एम.ए.(मराठी) बी. एड.

अनुभव :- 15 वर्षे

नवोपक्रम शीर्षक :- तुफानातील दिवे विझू नयेत म्हणून....

सन 2021-22

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. वैशाली शंकरराव शेंडे ............ प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला तुफानातील दिवे विझू नयेत म्हणून...

हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 22/11/2021

स्थळ : अकोला

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : वैशाली शं. शेंडे

शाळेचा / कार्यालयाचा शिक्का. समग्र शिक्षा, मनपा अकोला

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. वैशाली शंकरराव शेंडे ............ हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला तुफानातील दिवे विझू नयेत म्हणून ...

हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 22/11/2021

स्थळ : अकोला

Shaheen

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : Dr. Shaheen Sultana EO

शिक्का: Education Officer
Akola Municipal Corporation, Akola

# ऋणनिर्देश

शिक्षण क्षेत्रात कार्य करतांना विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो त्याच्या भविष्याला उज्ज्वल करण्याचे काम शिक्षण यंत्रणेतल्या प्रत्येकाचे आहेच. त्यात कुणी प्रत्यक्ष तर कुणी अप्रत्यक्षपणे जुळलेले असतात. हा धागा पकडूनच मी विषय साधन व्यक्ती म्हणून जेव्हा या क्षेत्रात पदार्पण केले तेव्हा पासूनच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी जे-जे करता येईल ते-ते करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. परंतु नवोपक्रम स्पर्धेमध्ये भाग घेण्याची ही पहिलीच वेळ..

आपला उपक्रमही टाकता येईल असे सांगणारे माझे सहकारी यांची मी कृतज्ञ आहे. हा उपक्रम कोवीडच्या पार्श्वभूमीवर सुरू केला तेव्हा नवोपक्रम म्हणून हे डोक्यात ठेवून वगैरे नव्हता. पण त्याला नवोपक्रमाचे मूर्त रूप देण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे मा. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर नागरे, सर्व अधिव्याख्याता तसेच समग्र शिक्षा मनपा अकोल्याच्या संपर्कप्रमुख डायट अधिव्याख्याता श्रीमती कविता बोरसे यांनी केलेले मार्गदर्शन मोलाचे वाटते. त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करते. या उपक्रमासाठी आमच्या समग्र शिक्षा मनपा अकोल्याच्या शिक्षणाधिकारी, मा. डॉ.शाहीन सुलताना, प्रशासन अधिकारी, मा. श्री प्रदिप चोरे, शाळानिरीक्षक श्री अनवर यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्यांचेही आभार व्यक्त करणे क्रमप्राप्त आहे. ज्या शाळांची ही मुले आहेत त्या शाळेचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षक यांचेही आभार. त्याचप्रमाणे मुलांच्या पालकांच्या मी ऋणातच राहणे पसंत करेल कारण त्यांच्या मदतीशिवाय मुलांचे या उपक्रमात जुळणे शक्य नव्हते.

समग्र शिक्षा मनपा अकोल्याच्या सर्व कर्मचाऱ्यांनी क्लास घेताना जी म्हणून मदत केली त्यांच्याही ऋणात राहू इच्छिते. या उपक्रमाच्या हस्तलिखिताला टंकलिखित करण्यासाठी मूर्तिजापूरच्या विषय साधन व्यक्ती श्रीमती किरण औंधकर यांनी आपला अमूल्य वेळ दिला म्हणूनच हा उपक्रम मला प्रत्यक्षात आणता आला त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे पसंत करेन.

ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य केले त्यांचे खूप आभार आणि धन्यवाद.

उपक्रम सादरकर्ता
वैशाली शेंडे
समग्र शिक्षा,मनपा अकोला

# अनुक्रमणिक


| अनु. क्र. | शीर्षक | पुष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रतिज्ञापत्र | 1 |
| २ | प्रमाणपत्र | 2 |
| ३ | ऋणनिर्देश | 3 |
| ४ | अनुक्रमणिका | 4 |
| ५ | प्रार्श्वभूमी | 5 |
| ६ | गरज | 6 |
| ७ | महत्व | 7 |
| ७ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 8 |
| ८ | नवोपक्रमाचे नियोजन | 8 -10 |
| ९ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 11 -14 |
| १० | नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती | 15- 16 |
| ११ | समारोप | 16 |
| १२ | संदर्भ सूची व परिशिष्टे | 17- 18 |

# तुफानातील दिवे विझू नयेत म्हणून....

## गरज व महत्त्व

पार्श्वभूमी –

२००६ चा नोव्हेंबर महिना, तारीख नऊ ला सर्व शिक्षा अभियान महानगरपालिका अमरावतीच्या कार्यालयात रुजू झाले. शिक्षक म्हणून तर कार्य चालूच होते पण आता सरकारी नोकरीची झालर त्यावर चढली होती. नव्या स्वप्नांच्या दिशेने पडलेले ते पाऊल होते. विश्वास दुणावला. शासकीय शाळांचा अनुभव मिळणार म्हणून मनाला सुखद धक्के बसत होते. त्यावेळेस माझ्या भागात जिथे मी राहण्यास होते तिथे शासकीय शाळा नव्हती, जी होती ती हायवे च्या दुसऱ्या बाजूला एक-दीड कि.मी. वरती. हायवे वाहता असल्यामुळे पालकांनी एका सामाजिक कार्यकर्त्याच्या माध्यमातून सरकारी शाळा मागणीचा प्रस्ताव म.न.पा. च्या आम सभेत मांडला. त्यावेळेचे तत्कालीन आयुक्त मा. उदयजी राठोड त्या प्रस्तावास दुजोरा देत त्याविषयीची कार्यवाही करण्यासाठी तत्कालीन शिक्षणाधिकारी मा. डॉ. सविता चक्रपाणी यांच्याशी संवाद केला. तो भाग माझा राहण्याचा असल्यामुळे मला ही सभेला बोलाविण्यात आले. माझ्यासह चार विषय तज्ञांकडे त्याभागाचा सर्वे देण्यात आला. सावित्री-जोतिबाच्या कार्यातून थोडं तरी उतराई होण्याचे कार्य आपल्याकडे आल्याने आनंदाला उधाण आलं होतं.

दाखलपात्र ६१ विद्यार्थी सर्वेक्षणात मिळाले होते. माझ्या तेव्हा चालू असलेल्या ट्युशन क्लासमुळे ३८ पालक येऊ घातलेल्या शाळेत पाठविण्यासाठी तयार झाले. सदर अहवाल मा. आयुक्ताकडे सादर केला. त्यांनी २६ जुन २००७ ला तूर्तास भाडेतत्वावर खोली घेऊन चालू करण्याचे मा. शिक्षणाधिकारी यांना आदेश दिले होते. परंतु अशी खोली त्याभागात कोणाकडेही नसल्यामुळे सदर शाळा माझ्याच घरातून मी सुरु केली. एका नव्या पर्वाला सुरुवात झाली होती. अनेकांनी शाळेला भेटी दिल्यात. १००% उपस्थिती पाहून सर्व शिक्षा अभियानातून शाळा बांधकामाचे आदेश देण्यात आले होते. या कार्यात स्वतः मा. आयुक्तांनी तत्कालीन नगरसेविकेच्या माध्यमातून शाळेसाठी मोकळ्या जागेचा सर्वे केला. तशी जागा कैलास नगरमध्ये त्यांना मिळाली आणि ऑगस्ट २००७ पर्यंत चार वर्ग खोली पैकी एका खोलीला थोडंफार नीट करून दिले. १५ ऑगस्ट २००७ ला नव्या इमारतीच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाचा पहिला तिरंगा मुलांच्या आणि पालकांच्या जल्लोषात फडविण्यात आला होता.

हे सांगण्याचे महत्वाचे कारण म्हणजे केवळ वंचितांच्या शिक्षणाचा ध्यास होय. मुलांसाठी शैक्षणिक कार्य करणे कायम आवडीचे क्षेत्र राहिले आहे. २००७ पासून वेगवेगळी प्रशिक्षण देणे-घेणे, मुलींचे शिक्षण, NPEGEL, शाळाबाह्य सर्वेक्षण यावर विशेष भर राहिला.दरवर्षी एका शाळेतील काही मुलांना (जी मुले वर्गात पहिली येतात अशा इयत्ता १ ली ते ८ वीच्या) स्वखर्चातून शैक्षणिक साहित्य देणे हे सामाजिक दायीत्वाचा एक भाग म्हणून करीत आहे. यातच मागल्या वर्षीचा कोरोना

काळ बरंच काही शिकवून गेला. मनात पुन्हा online शिक्षणापर्यंत न पोहोचणाऱ्या पण हुशार मुलांचा विचार डोक्यात घर करू लागला. तेव्हा आपल्याला काय करता येईल यादृष्टीने सदर उपक्रम हाती घेण्यात आला. आभाळ तर फाटलेले आहे कुठे कुठे टाका लावायचा; पण टाका लावू तेव्हाच तर ही जागा भरल्या जाईल आणि शोध सुरु झाला 'तुफानातील दिव्यांचा' नव्या दिशेने आणि नव्या जाणीवेने.

**गरज –**

अत्यंत भयावह परिस्थितीतून गेल्या दीड दोन वर्षात आपली वाटचाल सुरु होती आणि आहे. एका सुक्ष्मातीसुक्ष्म विषाणूने साऱ्या जगाला पळता भुई थोडी केली. असा हा सन २०२०-२१ चा कालखंड. जगातील सारेच व्यवहार ठप्प झालेले. सगळयाच क्षेत्रात शुकशुकाट. उद्धेश एकच "माणूस वाचला पाहिजे."

अशा परिस्थितीत शिक्षण प्रभावित झाल्यावाचून राहिलेले नाही. पहिलीत नव्या उत्साहानं पाय ठेवणाऱ्या मुलाला आपली प्राथमिक शाळाच पाहायला मिळाली नाही. इतर इयत्तातील मुलांचे पण तसेच. अशातच 'शाळा बंद-शिक्षण सुरु' असा महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम सुरु झाला. उपक्रमशील शिक्षकांनी घटकानुरूप विविध विषयांचे व्हिडीओज् बनवून त्यांच्या youtube ला upload केले. खाजगी आणि विनानुदानित शाळातील शिक्षकांनी online classes घेण्यास सुरुवात केलेली. पण हे सगळं शासकीय त्यातही महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांसाठी अश्यक्यप्राय गोष्ट होती. हातावर पोट असणाऱ्यांची ही मुलं त्यातही ८०% शिक्षकांच्या कोविड-१९ ला ड्युटी. विविध प्रकारची काम त्यांच्याकडून करवल्या जात होती. दोन नावेवर स्वार होऊन त्यांचे कोणतेच कार्य तडीस जाणार नाही म्हणून प्रशासनाने कोविड कर्तव्यावर लक्ष केंद्रित करण्याचे सूचित केले.

शिक्षक कोविड कर्तव्यावर विविध कामात गुंतलेली. त्यामुळे गृपवर शैक्षणिक व्हिडीओज, इयत्तानिहाय pdf पाठवून तर द्यायचे. पण स्वाध्याय सोडवण्यास मुलांपर्यंत जाणे बऱ्याचदा शक्य होत नसे. हे लक्षात येत होते. शिक्षकांना मुख्याधापकांना फोन द्वारे विचारणा व्हायची. परंतु त्याच्या कोविड कार्याचा व्याप पाहता काहीच शक्यता दिसत नव्हती. बऱ्याच शिक्षकांनी काही प्रमाणात पोहचण्याचा प्रयत्न केला पण विद्यार्थ्यांचा प्रतिसादही अल्पच. मग यातून आम्हीच म्हणजे विषय साधन व्यक्तींनी क्लृप्ती म्हणजे मध्यम मार्ग शोधला. ज्या विद्यार्थ्यांकडे whatsapp नंबर वा संपर्क नंबर होते अशा इ. २ री पासून तर इ. ८ वी पर्यंतच्या मुलांच्या पालकांशी संपर्क साधला. त्यांना शाळेचा U-DISE no. वैगेरे पाठवून CONVEGENIUS च्या लिंक्स पाठवल्या. ज्यांना हे ही कळत नव्हते, त्यांच्या पाल्यांना स्वाध्यायातील प्रश्न पाठवून वहीत लिहिण्यास सांगायचे. हे पाहूनच सातत्याने चांगला प्रतिसाद देण्याऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही तरी शैक्षणिकदृष्ट्या केले पाहिजे असे वाटायला लागले आणि यामुळेच या उपक्रमाची किती गरज आहे हे जाणवू लागले. किमान यातून ही चुणचुणीत मुले शैक्षणिक प्रवाहात तगून नक्कीच भविष्यासाठी नवी वाट निर्माण करू शकतील. हाच एक आशावाद त्यांच्यातील गरजेला साध्यापर्यंत नेण्यासाठी उपयोगी ठरणार होता.

## महत्व -

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला आम्हा विषय साधन व्यक्तींकडून online-offline व whatsapp group चा अहवाल घेत असतं. आमच्याकडे असणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सहकार्याने whatsapp group तयार करून मुलांपर्यंत अभ्यास पोहचविण्याचे कार्य आम्ही केले. पण असे लक्षात यायला लागले की, यातले ५ ते ७% मुलेच याला प्रतिसाद देत आहेत. थोडं खजील व्हायला लागलं होतं. मी गृपवर ज्यांचे प्रतिसाद येत आहेत अशा विद्यार्थ्यांच्या पालकांशी व प्रत्यक्ष मुलांशी संपर्क साधला. पालकांशी बोलतांना सांगितले की, आपला पाल्य चुणचुणीत आणि शिकण्याची जिद्द बाळगून असल्याने मी आपल्या मुलाचा वैयक्तिक अभ्यास घेण्यास इच्छुक आहे. ज्या वेळेस मी त्यांचा अभ्यास घेणार त्या-त्या वेळेस त्यांना मोबाईल उपलब्ध करून द्यावा एवढी एक अट आहे.

या उपक्रमाचे महत्त्व पालकांना पटावे म्हणून सुरुवातीला त्यांच्याशी बराच वेळ बोलावे लागले. कारण त्यांच्याकडे असलेल्या आर्थिकतेचा अडसर. पालक सांगायचे की, आम्ही फक्त बोलायसाठीच बॅलेन्स टाकतो. पण मी मात्र आज झालेला खर्च उदयाला कामाचा ठरेल असे सांगत. यातून मुले शिकतील त्यांना पुढच्या वर्गात जातांना कुठलीही अडचण येणार नाही. आणि त्यांचा वेळ सत्कारणी लागून शिक्षणापासून ते तुटणार नाही. एकदा का त्यांचं शिकणं थांबलं आणि वाईट संगतीतून ते जर भरकटले तर त्यांचं भविष्य अंधकारमय होईल. असं समजून सांगितल्यावर पालकही सजग व्हायचे. त्यांच्या पुढ्यात आरसा ठेवला आणि त्यांना या उपक्रमाचं महत्त्व पटायला लागलं. यात जुळलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची स्वतःची ही तळमळ होतीच म्हणून त्यांना उपक्रमाचे महत्त्व कळणे थोडे सोपे गेले.

## नवोपक्रमाची उद्धिष्टे –

१) मुलांमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून क्रमिक पुस्तकांसोबतच वाचनाची आवड निर्माण करणे.

२) म.न.पा. शाळेतील तेजोमय मुलांमधला प्रकाश कुठेही विझू न देणे.

३) मुलांच्या सर्जनशीलतेला व ज्ञान पिपासूवृत्तीला वाव देणे.

४) चांगल्या सवयींसोबत वैज्ञानिक दृष्टीकोन वृद्धींगत करणे.

५) मुळात हाताशी असलेल्या वेळेचा योग्य उपयोग करून घेणे व त्याला योग्य दिशा देणे.

## नवोपक्रमाचे नियोजन –

१) **उपक्रम पूर्व स्थितीचे नियोजन** –

हा उपक्रम सुरु करण्यापूर्वी online/offline बाबत ची स्थिती डोळ्यासमोर होतीच. याबाबतच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणात माझा सहभाग असल्यामुळे वस्तुस्थिती पुढ्यात होती. पालकांकडून त्याविषयीच्या नोंदीही होत्या. मोठी मुले कामात लागलेली तर लहान मुले दिवसभर बाहेर खेळण्यात. एकुणातच online/offline ला ५ ते १०% च्या वर प्रतिसाद नव्हता. या ५ ते १०% मुलांचा प्रतिसाद टिपून घेत विचारांचे चक्र सुरु झाले. पूर्वस्थितीला समजूनच उपक्रमाचे नियोजन करणे आवश्यक आहे हे ज्ञात होते. ही मुले करण्यातली आहे. जर यांना आपणच अध्यापनासाठी (online अध्यापनाच्या विविध माध्यमाचा उपयोग करून) दत्तक घेतले तर! आणि या पूर्वस्थितीला मूर्त रूप देण्याचे ठरविले. उपक्रमाच्या नियोजनाची प्रक्रिया सुरु झाली. प्रथम whatsapp गृप वरून मुलांचे मोबाईल नंबर घेऊन त्यांच्या पालकांशी थेट संपर्क सुरु केला. एक विश्वास पूर्ण नातं तयार केल्या नंतर पालकांनी मुलांना online अध्यापनासाठी दत्तक देण्याचे मनावर घेतले. सर्वप्रथम म.न.पा. मराठी शाळा क्र. ७ च्या क्रिश शाहा(इ ६ वी) च्या वडिलांशी संपर्क केला. त्यांनी त्यांच्या online अध्ययन अध्यापनासाठी होकार भरला. त्यानंतर रेखा आणि राधिका मिटकर च्या आईला संपर्क केला. त्यांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला. क्रिश शाहा च्या वडिलांनी त्यांच्या दोन मुली राधा आणि धनश्री (इ ७ वी व ४ थी) यांनाही या उपक्रमासाठी  दत्तक घेण्यासाठी सांगितले. म. न.पा. मराठी उच्च प्राथमिक शाळा २६ ला प्रत्यक्ष भेट देऊन कावळे मॅडम यांना माझ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. त्यांच्या वर्गात जर  एक-दोन मुले जी माझ्या उपक्रमात जुळण्यास उत्सुक असेल तर मला आवडेल. तेव्हा त्यांनी साक्षी गवई (इ. ७ वी) व प्रगती गवई (इ. ६ वी) या दोघींची online अध्यापनासाठी संमती दिली.

अशाप्रकारे क्रिश, राधा, धनश्री साक्षी, प्रगती ही सन २०२०-२१ ला online अध्यापनासाठी मिळालेली मुले. मुले वेगवेगळया इयत्तेतील असल्यामुळे सारख्या इयत्ता असणाऱ्या मुलांचा एक टाईमटेबल करण्यात आला. तो टाईमटेबल स्वतः मुलांनी तयार करून आधी मला पाठविला. कार्यालयीन कामकाज सांभाळून टाईमटेबल प्रमाणे कधी तरी अध्यापन शक्य झाले

नाही तर त्यापूर्वी त्यांच्याशी संपर्क करून वेळ देण्यात यायची. विषयानुरूप टाईमटेबलप्रमाणे अध्यापन करणे ही प्राथमिकता होती. यांच्या अध्यापना दरम्यान शाळाबाह्य सर्वेक्षण झाले तेव्हा आयुष ताठे हा विद्यार्थी सर्वेक्षणात मिळाला. वय वर्ष ७ (behaviour disorder) पण अति चंचल, शारीरिक वयापेक्षा मानसिक वयाने कमी असल्याने त्याच्याकरिता वेगळे नियोजन केले त्याला मनपा मराठी शाळा क्र. १७ ला प्रथम प्रवेशित करून आईबाबांचेच समुपदेशन करून त्याच्या शिकण्याचे नियोजन करणे क्रमप्राप्त होते. कारण आयुष वर्तन समस्या जरी असली तरी तो हुशार असल्याचे त्याच्याशी झालेल्या तीन भेटीतून जाणवले. अशाप्रकारे उपक्रमाच्या पूर्वस्थितीचे नियोजन करण्यात आले.

२) **संबंधित व्यक्तींशी चर्चा –**

माझ्याकडे असणाऱ्या शाळांमधून मला सर्वांचाच उत्तम प्रतिसाद मिळाला. म.न.पा. मराठी शाळा क्र. ७ च्या मुख्याधापकांकडे सदर उपक्रमासाठी आपल्या शाळेतील मुलांना अध्यापनासाठी दत्तक घेण्याचा मानस व्यक्त केला तर त्यांनी त्वरीत होकार भरला. त्यानंतर म.न.पा. मराठी शाळा क्र. १६ च्या श्रीमती मीना देशमुख मॅडम यांच्याशी प्रत्यक्ष भेटले आणि रेखा व राधिका मिटकर इ. ४ थी यांना online अध्यापनासाठी दत्तक देण्याबाबत विचारणा केली तर त्यांनीही होकार भरला. मराठी शाळा क्र. २६ च्या वर्ग शिक्षिकेशी साक्षी व प्रगती गवई इ. ७ वी आणि ६ वी यांच्याबाबत online अध्यापनासाठी विचारणा केली असता त्यांनी ही होकार दिला. शाळा बाह्य सर्वेक्षणात मिळालेला आयुष ताठे (cwsn) वय वर्ष ७ याचाही समावेश करण्यात आला.

प्रथम तर आयुषचे आईबाबा मनपा शाळेत दाखल करण्यास तयार नव्हते. आयुष या मुलांमध्ये कसा काय शिकेल? असा प्रश्न त्यांना होता. तेव्हा, 'तुम्हाला मी मनपा शाळेतच दाखल करण्यासाठी आग्रह करीत नाहीये'. असे सांगून तुम्ही आयुषला कुठल्याही शाळेत दाखल करू शकतो असे सांगितले. ते कॉन्व्हेंट ला जाऊन आले आणि त्यांनी जेव्हा आयुष्याला पाहिलं तर त्याला शाळेत दाखल करण्यास असमर्थता दर्शवली. त्यांच्याशी बराच वेळ आयुषच्या शाळेत दाखल करण्याबाबत चर्चा/संवाद करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या पालकांशी दीर्घ चर्चा केल्यानंतर होकार मिळू शकला. अशाप्रकारे हा उपक्रम प्रत्यक्षात साकार होण्यासाठी संबंधित व्यक्तींशी संपर्क, चर्चा महत्वाच्या ठरल्यात.

**३) आवश्यक साधनाचा विचार –**

या उपक्रमात दोनच साधने महत्त्वची होती १) नेटपॅक सह मोबईल अथवा कॉलिंग करण्यापुरते balance २) त्या त्या इयत्तेची क्रमिक पुस्तके, बुक्स आणि त्यासोबतच पेन, पेन्सील, रबर, कंपास पेटी.

**४) करावयाच्या कृतींचा क्रम –**

1) सारख्या वर्गात असणाऱ्या मुलांचे दिवस वेळ ठरवून घेतले. त्यांना टाईमटेबल दिला.
2) ज्या मुलांचे पालक फक्त संध्याकाळीच मोबईल देऊ शकायचे, जसे राधिका आणि रेखा यांच्यासाठी श्रावणीला सहाय्यक म्हणून मदतीला घेतलेले. (श्रावणी जाधव शाळा

रक्षकांची मुलगी) कारण ती त्यांच्या घराजवळच्या शाळेच्या एका खोलीत वास्तव्यास असल्यामुळे आणि आवड ही होतीच. तिला अभ्यासपुरक साहित्य पाठून त्यावर काय घ्यायचे हे whatsapp ला सांगायची. गणिताची चाचणी ती स्वतःच बनवून मला दाखवायची अशा प्रकारे रेखा-राधिका कृती पूर्ण करायच्या.

3) राधा, क्रिश, साक्षी, प्रगतीला पुस्तकाचे पान क्रमांक देऊन त्यावरची टिपणं काढण्यास सांगायची. कविता तालासुरात घेण्यासाठी व्हिडीओ कॉल, त्यावरचा अर्थ स्पष्ट करून त्याचे रसग्रहण करायचे. ती कविता ज्या कवींनी लिहिली त्या कवींच्या इतर कविता संग्रहातील आवडलेली कविता शोध आणि ती वहीत लिहा. ती का आवडली त्याचे स्पष्टीकरण लिहा. या ही कृतींचा समावेश होता.
4) गणितासाठी मुलांना व्हिडीओ लिंक पाठविल्या जायच्या. त्यातून भौमितिक रचना समजुन घेत. व्हिडीओ काल द्वारे मी प्रत्यक्ष फळयावर समीकरणे सोडवून दाखवायची
5) साप्ताहिक वेळापत्रकानुसार जात एखाद वेळी त्या विषयाचे अध्यापन जात झाले नसेल तर पुढल्या आठवड्यात त्या विषयाला प्राधान्य देऊन केले जायचं किंवा मग त्या विषयासाठी स्वाध्याय, स्व-अध्ययन करण्यासाठी whatsapp मेसेज द्यायची.
6) मी करवून घेतेलेल्या अभ्यासावर दिलेला स्वाध्याय पूर्ण करून त्याचे फोटो whatsapp ला पाठवणे.
7) कुठे अडचण आल्यास साधा कॉल वा voice messages पाठवणे.
8) चित्रकला, क्राफ्ट विषयाचाही समावेश करण्यात आला.
9) वर्तमानपत्र वाचा, तुम्हाला जि बातमी आवडली ती लिहा क्रमिक पुस्तक व्यतिरिक्त चे शिकणे जास्त करण्यात आले.

**५) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण –**

गेल्या दीड वर्षापासून मुलं आणि त्यांचे पालकही माझ्याशी आणि उपक्रमाशी जुळले असल्यामुळे आमच्यात एक विश्वासाचे नाते निर्माण झाले. नवीन शैक्षणिक सत्रात लगेच त्यांनी या वर्षाची पुस्तके कसे मिळणार? आणि या पण वर्षी तुम्ही मुलांचा अभ्यास घेणार न? असे अधिकार वाणीने विचारले. या सत्राची पाठ्यपुस्तके शाळांना दिल्या बरोबर मुलांच्या पालकांना पुस्तके घेण्यासाठी शाळेत पाठविले. जि पुस्तके समग्रला (मागील वर्षीची) शिल्लक दिसली त्यातली धनश्रीला, राधाला दिलीत. क्रिशाला तर राधाचीच उपलब्ध होती.

ज्यावेळेस मी कार्यालयीन कामकाजात व्यस्त असायची त्यावेळी आणि माझा online क्लास व्हायचा नाही तर राधा, क्रिश, साक्षी व्हाईस मेसेज व प्रत्यक्ष फोन करूनच विचारायचे, ‘ मॅडम, क्लास लेंगे की नही?’ जर शक्य झाले नाही तर काहीतरी अभ्यास द्या हा आग्रह असायचा. आदल्या दिवशीचा आढावा घेऊन मग वेगळया विषयाचे स्वाध्याय द्यायची. यातून मुले स्व-अध्ययन करण्यास तयार झाली. स्वतःच गुगलवरून वेगवेगळे उपक्रम जसे, सामान्य

ज्ञान चाचणी सोडवणे, गणिताची कोडी सोडवत. उदाहरणे तयार करत. निबंधासाठी विषय दिला की, काही स्वतःच्या कल्पनेतून तर काही वेळा गुगलची मदत घेत.
यातून मुले स्वतःच स्वतः शिकण्यास तयार होत आहे असे निदर्शनास येऊ लागले. अडचण आली तर तेवढी दूर करायची, यावर आता भर असून त्यांनी केलेल्या कृतीना तपासून कौतुक केले, स्टार पाठवले की, ती अधिक आनंदाने आणि विश्वासाने अध्ययन करीत असल्याने प्रत्यक्ष दिसून येत आहे.

उपक्रम अजूनही सुरु आहे. परंतु प्रत्येक टप्प्यावर मुलांच्या प्रगतीचा आढावा घेत आहे. मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणे हा ही मुख्य उद्देश होता. शिकण्याची जिद्द संपता कामा नये यासाठी उपक्रमाची व्याप्ती यावर्षी सलगपणे सुरु आहे . कारण शाळा सुरु होण्यास अजूनही निश्चित कालावधी सांगता येत नाहीये. या माध्यमातून मुलांना नवोदयच्या परीक्षेकरिता तयार करून तिथवर पोहचवणे हे उद्दिष्ट्ये असल्यामुळे यावर्षी राधा शाह आणि आनंद इंगोले यांना नवोदयच्या ९ वी च्या प्रवेश परीक्षेकरिता बसविले. त्यांच्या वर्गशिक्षकांकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांचे प्रवेशफॉर्म भरून घेतले. येत्या परीक्षेपर्यंत त्यांची तयारी करून घेणे हा संकल्प सध्या मनी बाळगून आहे.

**६) उपक्रमासाठी इतरांची मदत -**

समग्र शिक्षा म.न.पा. अकोला अधिनस्त कर्मचाऱ्यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले. जेव्हा मी online, zoom app, व्हिडीओ कॉलद्वारे अध्यापन करतांना दिसायची तेव्हा तिथे शांतता राहील याकडे सर्वांचे आवर्जून लक्ष असायचे. बोर्डावर समजावतांना साफिया खान (विषय साधन व्यक्ती म.न.पा. अकोला) माझी सहकारी मोबाईल हॅण्डल करण्यास मदत करायची.

## उपक्रमाची कार्यवाही

नियोजनात उल्लेख केल्याप्रमाणे आता प्रत्यक्ष उपक्रमाच्या कार्यवाहीला सुरुवात झाली. सुरुवातीला माझ्याकडे असणाऱ्या शाळांसाठी गुगल फॉर्मद्वारे विविध विषयाच्या ज्या चाचण्या तयार केल्या होत्या, त्या आता गृप सोबतच या मुलांच्या वैयक्तिक whatsapp ला पाठविण्यास सुरुवात केली. याद्वारे त्यांचे त्या इयत्तेचे मूल्यमापन तर झालेच आणि पुढे अध्यापनाची दिशा ठरविण्यास पुरकही ठरले.

सर्वप्रथम क्रिश शाहा या उपक्रमात जुळला. म.न.पा. मराठी शाळा क्र. ७ चा इ. ६ वी मध्ये शिकणारा हा विद्यार्थी. क्रिशला सुरुवातीला टाईमटेबल बनविण्यास सांगितला. त्याचे व्हिडीओ कॉलवरून अध्यापन पाहून त्याच्या चारही बहिणी त्याच्यामागे आपआपली पुस्तक घेऊन बसायच्या. धनश्री इ. ४ थी आणि राधा इ. ७ वी यांच्या अभ्यासाबाबत ही त्यांच्या वडिलांनी मला विचारले, 'मॅडमजी ये दोनोंभी आपसे पढना चाहते है, क्या आप इनको भी सिखायेंगी?' असं करत आता एकाच घरातील तिघांनी फोन, व्हिडीओ कॉल, whatapp, voice massages द्वारे शिकणे सुरु केले. पुढे आणखी विश्वास बळावला. माझ्याकडे असलेल्या म.न.पा. मराठी शाळा क्र. १६ च्या इ. ४ थी च्या

रेखा आणि राधिका मिटकर या चुणचुणीत मुली जुळल्या. त्यांची आई घरगुती कामावर जात असल्यामुळे त्यांना संध्याकाळी अभ्यास द्यावा लागायचा. त्यांचा अभ्यास whasapp ला, voice messages व्द्वारे पाठवत होते. पण त्यांना नीट समजावणे होत नाही हे पाहून त्यांना मी आणखी कुणाची मदत मिळते का म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका मीना देशमुख मॅडमशी संपर्क केला. तेव्हा त्यांच्याच शाळेचे शाळा रक्षक श्री जाधव यांची मुलगी श्रावणी त्यांना अभ्यास घेण्यास मदत करेल असे सांगितले. श्रावणीशी संपर्क केला. तीने होकार भरला. आता संपूर्ण अभ्यास म्हणजे चौथीच्या बेसिक भागाची उजळणी वाचन व लेखन घेण्यास सांगितले. एक प्रकारची ती ट्युशन आणि सपोर्टिंगमध्ये माझं बोलणं. काना, मात्राच्या चुका दुरुस्त करून घेणं, संख्याज्ञान, संख्यावाचन, बेरीज, वजाबाकी, परिसर अभ्यास, काही प्रमाणात इंग्रजी असं चालू झालं. यांचा प्रतिसाद मिळू लागला. यांचं शिकणं श्रावणीच्या सहकार्यानं सुरु झाल्यामुळे आता online साठी दुसऱ्या शाळेतील मुलांचा शोध सुरु होता. अशातच शाळा क्र. २६ च्या साक्षी आणि प्रगती गवई यांच्याशी संपर्क झाला. तिच्या आईशी भेटले आणि त्यांच्यातील शिकण्याची जिद्द, आईचा मुलींप्रती कळवळा, पाहून त्यांना ही या उपक्रमात सामील केलं. आता या उपक्रमात सात विद्यार्थी जुळले. विद्याप्राधिकरणाकडून प्राप्त होणारे स्वाध्याय (convegenius) त्यांच्याकडून सोडवून घेतले.त्यात अडचण आली तर त्यावरचेच अध्यापन त्यापद्धतीने केले जायचे. दिक्षा ॲपचा वापर आणि पूरक अध्ययन होण्यासाठी संबंधित विषयाच्या यु-ट्युब लिंक्स पाठविल्या जायच्या. धनश्रीकरिता माझ्या whatsapp ला आलेले इ. ४ थी चे विषयनिहाय व्हिडीओ पाठविण्यात यायचे. राधा आणि क्रिशचे अध्ययन चालू असताना धनश्रीला तिच्या क्रमिक पुस्तकातून वाचन कर, कविता लेखन कर, बेरीज-वजाबाकीची उदाहरणे तयार कर इ. कामे द्यायची.

आयुष ताठे असा विद्यार्थी जो केवळ वर्तन समस्या यामुळे शाळा प्रवाहातून बाहेर होता. आई-वडिलांना तो कॉन्व्हेंटमध्ये शिकावा ही इच्छा. तर कॉन्व्हेंटवाल्यांनी त्याच्या या वर्तन समस्येमुळे प्रवेश नाकारलेला. त्याला शाळा बाह्य सर्वेक्षणात घेऊन मनपा मराठी शाळा क्र. १७ मध्ये प्रवेशित केले आणि त्याच्या पालकांना विश्वास दिला की, शाळा तर त्याला घडवेलच परंतु तत्पूर्वी तुमची आयुष सोबत असलेली अवाजवी अपेक्षा थोडी बाजूला ठेवावी लागेल ( डॉक्टरांच्या दिलेल्या वैद्यकीय सल्ल्याच्या आधारे). सुरुवातीला त्याच्या वर्तन समस्येवर काम होणे आवश्यक वाटले. त्याची बैठक वाढावी व तो गुंतून राहावा अशा छोट्या छोट्या कृती घ्याव्या लागतील असे सांगत आयुषच्या आईला त्याची प्रथम शिक्षिका बनविले. त्यासाठी आठवड्यातून एकदा आयुषच्या आई व बाबांचे प्रत्यक्ष समुपदेशन करण्यात आले. त्या समुपदेशनात घरातील व्यक्तींनी आणि प्रत्यक्ष स्वतः आई म्हणून काय करावे व काय करायचे टाळावे हे सांगितले.जसे की, त्याला एखादी गोष्ट करू नकोस म्हटले की, ती मुद्दाम करणे, रागावले की तो अधिकच चिडणे, याला हात नको लावू, इथे नको जावू, असे म्हटले की उलट वागणे. या सर्व बाबींवर उपाय काय? कसे कमी करता येईल? आई म्हणून काय गफलत होते आहे? इ. गोष्टी त्यांच्या लक्षात आणून दिल्या हे ऐकून त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव टिपण्यासारखेच होते. त्या म्हणाल्या," मॅडम, तुम्ही खरं सांगता!" असंच होते. हे स्वीकारल्या नंतर त्यांना जुलै महिन्यात शाळापूर्व तयारीच्या कृती करावयास दिल्या. संपूर्ण कृतींची यादी तयार करून सातत्याने त्या कृती

केव्हा, कशा, कितीदा घ्यायच्या यावर बोलायची. त्याप्रमाणे त्यांनी कृती घ्यायला सुरुवात केली. आयुषने केलेल्या कृतींचे व्हिडीओज् पाठवायला सुरुवात केली.

मुलांची प्रत्येक विषयातील प्रगती पाहून त्यांना क्रमिक पाठ्यापुस्तकाव्यतिरिक्त ज्ञानरचनावादी दृष्टीकोनातून अध्ययन अनुभव देण्याचे ठरविले. त्यात १) शाब्दिक उदाहरणे तयार करा, २) गुगलच्या आणि पाठ्यपुस्तकाच्या आधारे इंग्रजी शब्दांचे अर्थ शोधून त्या शब्दांचा वाक्यात उपयोग करा, ४) मराठीत निबंध लिहा, ५) हिंदी मध्ये चित्र वर्णन करा, ६) घराच्या घरी विज्ञानाचे सोपे प्रयोग करा, ७) भूगोलामध्ये परिभ्रमण-परिवलन या संकल्पना व्हीडीओ च्या माध्यमातून समजून घ्या. ८) गणितातील भौमितिक रचना, कोणाचे प्रकार, चौकोनाचे प्रकार, त्रिकोणाचे प्रकार, ९) इतिहासातील घटनांचा मागोवा १०) सामान्य ज्ञान मध्ये आपल्या देशातील राज्यांच्या राजधान्या शोधून काढणे इ. घटकांचा समावेश केला. मुलं शोधक झाली. या मध्ये अडचणी आल्यावर मुलांनी गुगल,दिक्षा अॅप, यु-ट्युब चा लीलया वापर केला व त्यांचे स्वतःचे शिकणे सोपे आणि आनंदाचे झाले. सदर कार्य वही मध्ये लिहिल्या नंतर त्याचे फोटो मला पाठवायचे. सुटसुटीत लेखन पाहून आणि मुलांची वळणदार अक्षरे पाहून त्यांच्यातील चित्रकारालाही जागं केलं पाहिजे असे वाटायला लागले. यामुळे दोन गोष्टी साध्य करता येईल. त्या म्हणजे अध्यापनासोबतच त्यांच्या सर्जनशीलते आणि सृजनशीलतेला वाव मिळेल. मग त्यांना १) कुठलाही विषय न देता आवडीचे चित्र काढा, २) प्रसंगानुरूप जसे २६ जानेवारीला पर्यावरणाशी संबंधित चित्र काढा, ३) ज्या दिवशी online अध्यापन झाले नाही त्या दिवशीला whatsapp ला त्यांना विषय देऊन चित्र काढण्यास सांगितले जायचे. १५ ऑगस्ट ला तर प्रगतीने खडतर परिस्थितीत ही सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांचे अतिशय बोलके चित्र काढून कृतज्ञता व्यक्त केली. १५ ऑगस्ट ला व्हिडीओ कॉल द्वारे स्वतंत्र दिनाचे काय महत्व आहे यावर मुलांनी आप आपले विचार मांडले.

ही मुलं वेगवेगळया इयत्ताची असल्यामुळे त्यांचे शिकणे आणि आपले शिकवणे आंनद देणारे ठरावे याचा जास्त विचार करणे आवश्यक होते. क्रिश, राधा, साक्षी, प्रगती यांना बऱ्याचदा समान कृती असणारे अध्यापन करायचे. जसे गणितामध्ये शाब्दिक उदाहरणे तयार करा, एकमान पद्धती, पूर्णांकयुक्त अपूर्णांकांचा भागाकार गुणाकार, मराठी साठी वर्तमान परिस्थितीशी मेळ खाणारे निबंध, औपचारिक-अनौपचारीक पत्र लेखन, पाठ वाचा आणि त्यावर प्रश्न तयार करा, दिलेल्या विषयावर मत मांडा उदा. पर्यावरणाचा ऱ्हास का होतो आहे? कोरोना विषयी काय सांगाल? इ. मुलं चौकस होऊन बोलती व्हायची. ही प्रक्रिया द्विमार्गी (आदानप्रदान) होत असल्याने मी उपस्थित केलेल्या प्रश्नातून मुलांच्या विचार प्रक्रियेला अधिकच चालना मिळू लागे.

२०२०-२१ मध्ये क्रिश आणि राधाचा उत्तम सहभाग राहिला म्हणून येणाऱ्या सत्राच्या अभ्यासाकरिता त्यांना रजिस्टर सेट, कंपासपेटी देऊन नवीन सत्रासाठी प्रेरीत केले.

**कार्यवाही करतांना आलेल्या अडचणी –**

हा उपक्रम सलग चालू राहण्यासाठी मी आणि मुलं, पालक मनापासून तयार तर होतोच, पण बऱ्याचदा क्रिश वडिलांसोबत फर्निचर बनविण्यासाठी जायचा. मी १२ ला फोन लावायची,'क्रिश online class शुरू करे क्या?' तर तो म्हणायचा, 'मॅडम २ बजे खाने के छुट्टीमे कॉल करना. मै दुकान के कोनेमें बैठ के सुनुंगा, बुक्स साथ लाया हुँ, लिखुँगा भी.' मग दुपारी पुन्हा कॉल करावा लागायचा.

तो दुकानात असल्यामुळे राधा, धनश्री ला शिकवता येत नव्हते. मग त्याच्या whasapp ला मी कृतीप्रवण अभ्यास पाठवायची जसे की ' मला जर पंख असते तर !' यावर तुझे मनोगत लिही. धनश्रीसाठी ( ४ थी) तिला ही बेरीज वजाबाकीची उदाहरणे तयार करून पाठव, अशा सारख्या कृती द्यायची. त्यामुळे ती स्वतः नव नवीन गणित तयार करायला लागली आणि ते तिला जमायलाही लागलं.

साक्षी, प्रगतीला ही बरेचदा net balance नसल्यामुळे calling करून कृती द्याव्या लागायच्या. पण मुलं ही आवडीने करायची. तुम्हाला आवडते ते चित्र बनवा. वर्तमानपत्रातील बातम्या वाचा आणि आवडलेल्या बातमीला लिहून काढा. ती कशाशी संबंधित आहे ते फोनकरून कळवा. अशाप्रकारे मुलं वर्षभर अध्ययनरत आणि कृतीप्रवण राहिलेत आणि आताही आहेतच.

आयुषची डॉक्टरांची treatment सुरु होती. त्यांच्यातील अडथळयामुळे खाजगी शाळेने प्रवेश नाकारला होता. मग त्याला म.न.पा. मराठी शाळा क्र. १७ मध्ये मी त्याला शिक्षकांच्या मदतीने प्रवेशित केले. पालकांना समुपदेशन करून अतिशय सकारात्मक केले. त्यांनी आयुषसाठी काय करावे, काय करू नये, कुठे रोखावे, कुठे टोकावे? याबाबतची एक तास पालकांची मिटिंग घेतली. त्याच्यासाठी आठवड्याभराची उपक्रमाची यादी करून दिली. जसे, ओल्या कणकेचे गोळे करणे, स्वयंपाकातील वस्तूंना गंध, चव, स्पर्शाद्वारे ओळखण्यास सांगणे, फुल ओवणे, सुईत धागा ओवणे, एकत्रित केलेली धान्य वेगळी करणे, ओल्या मातीतून आकार बनविणे इ. (यादी मोठी आहे.) यामध्ये लीना रामटेके (विषय साधन व्यक्ती, म.न.पा. अकोला) माझ्या सहकारी यांनीही यादी बनविण्यास सहकार्य केले.

बऱ्याचदा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वा माझे online प्रशिक्षणं, कार्यशाळा राहिल्यास online अध्यापन घेण्यामध्ये अडथळा यायचा त्यादिवशी केवळ एखाद्या विषयाचा अभ्यास स्वतः कर असा मेसेज टाकावा लागे.

## फलनिष्पत्ती -

या उपक्रमातून पुस्तकाव्यतिरिक्तच्या शिक्षणाला मुलांनी समजून घेतलेले. गुगलवरून गोष्टींचा शोध घेऊन त्या वहीत टिपून घेणे व पाठवणे.पाठ्यपुस्तकातील कविता वाचून संबंधित कवितेच्या कवींच्या विविध कविता गुगल वरून मुलं शोधायाचे आणि आवडलेली कविता वहीमध्ये लिहून घ्यायचे. ती कविता का आवडली? ती कशाशी संबंधित आहे? हे ही मुले स्वतःहून करायला लागली. या गोष्टी त्यांना सहज जमायला लागल्या. क्राफ्टचे व्हिडीओज् पाहून ते करून बघणे जमले.

मुलांच्या सर्जनशीलतेला व ज्ञानपीपासू वृत्तीला वाव देणे हे महत्वाचे उद्दीष्ट होते. केवळ पुस्तकी ज्ञान जसे की, क्रमिक पुस्तकातून शिकविणे, प्रश्नोतरे देणे यातून त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळणार नव्हता. तो निव्वळ क्रमिक अभ्यासाचा भाग झाला असता त्या ऐवजी मुलांना वेगवेगळे विषय देऊन जसे भासेचे निबंध स्वत:च्या कल्पनेतून लिही, विज्ञानाच्या अनुषंगाने घरच्या घरी प्रयोग करा. कोरोना महामारी आटोक्यात आणण्यासाठी तुम्ही कशावर भर द्याल, भूगोल विषयातपृथ्वी परिवलन, परिभ्रमण, दिवस रात्र कसे होतात, वृत्ते, अक्षांश-रेखांश, सामान्य ज्ञानामध्ये देश, राज्य, वेगवेगळे वैज्ञानिक शोध कोणी लावले? यासाठी बऱ्याचदा गुगल वापरा, व्हिडीओ पहा, अशा सूचना लिहून पाठवायचे त्यामुळे मुले वेगळा विचार करून त्यांच्या आत दडलेल्या सुप्त गुणांचा ही अविष्कार पहावयास मिळाला.

चांगल्या सवयी सोबत वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करणे यालाही चांगला प्रतिसाद मिळाला. एकदा मुले म्हटले की, 'निसर्गातील घटना देव घडवून आणतो'. जसे दिवस-रात्र, ग्रहण इत्यादी.तेव्हा त्यांना या घटनेला वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्पष्ट केले. व्हिडिओज पाठवले. देव हे श्रद्धास्थान आहे; परंतु निसर्गातील घटना, जन्म-मृत्यू यामागे विज्ञान आहे. त्यानंतर मुलांनी आपला दृष्टिकोन बऱ्यापैकी बदलला. चांगल्या सवयी मध्ये मुलं लवकर उठायची. कोरोना महामारीत हात धुण्याच्या, मास्क वापरण्याच्या सवयी सोबतच गर्दीत जाणे टाळू लागलीत. जेवणाआधी हात धुणे, स्वच्छ राहणे, अंघोळ करणे त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग झाला आहे.

मनपा शाळेतील हा तेजोमय कुठेही विझू नये त्यासाठी या विविधांगी उपक्रमाचा दिव्यातील तेल म्हणून उपयोग झाला. मुलं शोधक झाली. दर दिवशीचा एक टास्क म्हणून मुलं दिवसभर कार्यान्वित रहायची. स्वतःला आवडलेल्या व सुचलेल्या गोष्टी आवडीने पाठवू लागले. भाषेचा पोत समजायला लागला. काना, मात्रा, वेलांटी असतानाचे उतार चढावाचे वाचन जमले. विशेष म्हणजे शिक्षणाशी नाळ जुळून राहिली. प्रत्येक विषयाला मुले स्वतःहून समजून घेऊ लागली. टाइमटेबल प्रमाणे एखाद्या विषयाचे अध्यापन झाले नाही तर त्यांना मेसेज द्वारे त्यांच्या आवडीचा एखादा विषय करण्यासाठी उद्युक्त करायचे. कधी कधी मुले स्वतःहूनच विषयाचे अध्यापन करायचे व त्याचे फोटो


whatsapp ला पाठवयाचे. क्राफ्ट चे व्हिडीओज पाहून तशा कृती करणे.हे महत्वाचे शिकणे होते. सामान्य ज्ञानाच्या विषयासाठी स्वतःहून पुढाकार घेतल्या जायचा. यामध्ये देशाच्या नावापासून पंतप्रधान, राष्ट्रपती, आपल्या राज्याचे मुख्यमंत्री यांची माहिती मिळवून ते वहीत लिहायचे.


या उपक्रमाचे वेगळेपण सांगताना मला आनंद होतो की, जी मुलं निबंध, मुलाखत, पत्र लेखन, वाक्यात उपयोग, शब्दांचा वाक्यात उपयोग म्हणींचा वाक्यात उपयोग जाहिरात, प्रश्न तयार करणे, छोटे छोटे विज्ञानाचे प्रयोग घराच्या घरी करून बघणे, प्रयोगांती सूर्योदयाच्या वेळांची नोंद करणे या पासून दूर होती ती आता खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष कृतीतून स्वतः करताहेत. म्हणूनच सर्वार्थाने या उपक्रमाचे हे वेगळेपण असून तीच त्याची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल.

दुसरी महत्त्वाची फलनिष्पत्ती म्हणजे माझ्या उपक्रमामध्ये समविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांपैकी दोघांनी नवोदय प्रवेश परीक्षेकरिता फॉर्म भरलेला आहे. यामध्येच नव्याने या उपक्रमामध्ये जुळलेला आनंद इंगोले याचा समावेश नवोदय परीक्षेसाठी करण्यात आला. ही माझ्या उपक्रमाची यशस्वीताच आहे.

## समारोप :

अशा तुफानातही हे दिवे उजळत राहिले. पल्ला मोठा आहे. हे दिवे उजळण्यासाठी माझा तेवढाच खारीचा वाटा म्हणून माझ्या या उपक्रमाकडे मी कृतज्ञतेने बघते आहे.  परंतु शिक्षक आणि माझ्यासारख्या पर्यवेक्षकीय यंत्रणेत काम करणाऱ्यांना अशा दिव्यांचा शोध घेऊन त्यांच्यातील सर्जनाचा आणि सृजनाचा नवा आविष्कार घडविण्यासाठी मोठी संधी आहे. असे केले तर अनेक तुफानातील दिवे एका सूर्याच्या तेजाने झळाळून या देशाला ते अधिक तेजोमय करतील यात दुमत नाही.



कु. साक्षी अनिल गवई (वर्ग 7 वा) 'ब'

प्र. 1) पुढील आकृतीचे योग्य नाव सांगा.
उत्तर:- रेषाखंड

प्र. 2) पाच एकक व सोळा दशक म्हणजे किती?
उत्तर:- 165

प्र. 3) मंथन व अकबर या मित्रांनी कोरोना निधीसाठी अनुक्रमे 345 रुपये व 238 रुपये निधी संकलन केले, तर दोघांनी मिळून एकूण किती निधी संकलन केले?
उत्तर:- 345 + 238 = 583
∴ दोघांनी मिळून एकूण 583 निधी संकलन केले.

प्र. 4) 3, 4 व 9 ने विभाज्य असणारी संख्या कोणती?
उत्तर:- 3, 4 व 9 ने विभाज्य असणारी संख्या = 36

प्र. 5) दोन संख्यांचा मसावि काढणे म्हणजे सर्व प्रथम संख्यांच्या ------ यादी करून त्यांतील सर्वात मोठी संख्या शोधणे.
उत्तर:- विभाजकांची

प्र. 6) बागेमध्ये 13 रांगांमध्ये एका रांगेत 15 याप्रमाणे आंब्याची झाडे लावायची असतील तर एकूण किती आंब्याची झाडे लागतील?
उत्तर:- 13 × 15 = 65 + 130 = 195
∴ एकूण 195 आंब्याची झाडे लागतील.









लिंक :

1.https://forms.gle/gKkzRv4ZbwixNmYx9

2.https://drive.google.com/file/d/1BCyB7IOQLbHiEE492ad7DEQaQpuQo88x/view?usp=drivesdk

संदर्भ सूची :

1. मूल घडतांना आणि घडवितांना - रेणु दांडेकर

2. नापास मुलांचे प्रगती पुस्तक - अरुण शेवते